# 13TH N. B. NAIK MEMORIAL GOVERNMENT LAW COLLEGE
# MARATHI MOOT COURT COMPETITION, 2012

## वस्तुस्थिती

राम व प्रिया हे दोघे रेशीमगाठी या मालिकेत मुख्य भूमिका करत होते. दोघांच्या अभिनय व कलागुणांमुळे अल्पावधीतच मालिका लोकप्रिय झाली व त्यांच्या जोडीची चर्चा सर्वत्र होऊ लागली.

राम व प्रियाच्या घरातल्यांनी त्यांच्या संमतीने दोघांचे लग्न जमवले व लग्न ठरवताना रामच्या घरच्यांची अट होती की, प्रियाने लग्नानंतर मालिका किंवा चित्रपटात काम करायचे नाही व ही अट प्रिया व तिच्या घरच्यांना मान्य होती. रामचे वडील एक प्रसिद्ध लेखक व राज्यसभा सदस्य असल्याने त्यांच्या प्रतिष्ठेला शोभेल असे लग्न त्यांना हवे होते म्हणूनच रामच्या वडिलांनी लग्न खर्च स्वत: करण्याचे ठरविले. दि.१४.०२.२००५ रोजी थाटामाटात राम व प्रियाचे लग्न झाले. लग्नानंतर राम व प्रिया वांद्रे येथील बंगल्यात राहावयास गेले.

राम व प्रिया लग्नानंतर मलेशियाला गेले असता रामने रात्री दारू पिऊन हॉटेल मालकाशी भांडण काढले. त्याला सावरण्यास गेलेल्या प्रियाला रामने नशेत शिवीगाळ केली व दोन थप्पड मारल्या. सदर घटनेबद्दल रामने दुस-या दिवशी सकाळी प्रियाची माफी मागितली व आपण इथून पुढे कधीही दारू पिणार नाही अशी ग्वाही दिली. परंतू यानंतर ही रामचे दारूचे व्यसन सुटले नाही. रामला लहान मुलं खूप आवडत होती परंतु प्रियाला इतक्यात मुल नको असल्याने वारंवार त्यांच्यामध्ये वाद होत असे. रोज तो दारू पिऊन प्रियाला दमदाटी करत असे व कधी कधी मारहाण ही करत असे. रोज काहीना काही कारणाने दोघांमध्ये भांडण होत असे. दि. १६.०४.२००९ रोजी प्रियाने अक्षय नामक मुलास जन्म दिला.

रामच्या व्यसनाधिन पणाला व रोजच्या भांडणाला कंटाळून प्रियाने दि.१६.०६.२००९रोजी घर सोडले व मुंबई जवळील ठाणे शहरात राहण्यास गेली. काही दिवसांनी प्रियाने पुन्हा मालिकेत काम करण्यास सुरूवात केली व आपला व आपल्या मुलाचा उदरनिर्वाह करू लागली. दरम्यानच्या काळात रामने व्यसन सोडण्यासाठी आपले नाव व्यसनमुक्ती केंद्रात नोंदविले. रामचे व्यसन आज रोजी सुटले असून त्याने परत आपल्या व्यवसायात जम बसविलेला आहे. रामने ब-याच वेळा प्रिया व अक्षयला भेटण्याचा प्रयत्न केला असता प्रियाने रामला अक्षयला भेटू दिले नाही. तिला रामकडे परत यायचे होते परंतू राम प्रियाला काम सोडण्यास सांगत असल्याने ती त्यास तयार नव्हती.

दरम्यानच्या काळात स्टार डस्ट या मासिकात प्रिया व तिचा सहकलाकार विक्रम यांचे एकत्रित छायाचित्र प्रसिद्ध करण्यात आले व त्यांच्या प्रेम संबंधाची सदर मासिकात खमंग चर्चा करण्यात आली.

दि. २७.०६.२०११ रोजी प्रियाने ठाणे येथील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) येथे हिंदू विवाह कायदा कलम ९ अंतर्गत वैवाहिक संबंध पुर्नस्थापित करण्यासंबंधी याचिका दाखल केली. त्याच याचिकेत अक्षयच्या व स्वत:च्या

पालनपोषनासाठी दरमहा रू. २०,०००/- मागणी केली. रामने सदर याचिकेत कांउंटर क्लेम करत हिंदू विवाह कायदा कलम १३ (१अ व १ब) अंतर्गत  घटस्फोटाची मागणी केली व त्याच याचिकेत अक्षयचा ताबा मिळविणेसाठी वेगळा अर्ज केला होता. प्रियाने कांउंटर क्लेमला उत्तर देत असे म्हटले की काम सोडण्यास सांगणे हे तिच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणण्यासारखे आहे म्हणून ते तिला मान्य नाही व आपण हिंदू विवाह कायदा कलम १३ (१अ व १ब) अंतर्गत कोणतेही कृत्य केले नाही.  याचिकेच्या सुनावणीअंती मा. न्यायालयाने रामला प्रियाशी वैवाहिक संबंध पुर्नस्थापित करण्याचे आदेश दिले व वैवाहिक संबंध पुर्नस्थापित करे पर्यंत अर्जाच्या तारखे पासून अक्षयच्या पालनपोषनासाठी दरमहा रू. १०,०००/-  देण्यास सांगितले. सदर आदेशा विरूध्द रामने अपिल दाखल केले आहे व सदर अपिल आज रोजी अंतिम सुनावणीसाठी मा. न्यायालयासमोर आले आहे.